नव्वदोत्तरी मराठी ग्रामीण कादंबऱ्यातील कृषि संस्कृती व लोकजीवन एक विवेचक अभ्यास. (निवडक कादंबऱ्या)

१.१ प्रस्तावना :

इ.स. १९६० नंतर मराठीमध्ये अनेक साहित्यप्रवाह उदयास आले. उदा. दलित, ग्रामीण, स्त्रीवादी, आदिवासी आणि आंबेडकरवादी इत्यादी वरील साहित्यप्रवाह पैकी ग्रामीण साहित्याचा विचार करित असतांना त्यात अंतर्भुत होणाऱ्या घटकांचा विचार करावा लागेल. कृषि संस्कृती व लोकजीवन हे प्रामुख्याने ग्रामीण साहित्याचा गाभा आहे असे लक्षात येते. ग्रामीण कथा, कविता इत्यादी वाङ्मय प्रकाराबरोबरच कादंबरीतुन वरील आशय विस्तृतपणे चित्रित झाला आहे. कादंबरीच्या माध्यमातुन लेखक ग्रामीण जीवनाची अनेक वैशिष्ट्ये उलगडून दाखवतो तसेच भाषिक कौशल्याचा वापर करित असतो. कादंबरी वाङ्मय प्रकारात समाजातील लोकजीवन, संस्कृती, सभोवतालचे वातावरण त्यांचे विविध प्रश्न समस्यांचे हाताळणी करतांना आपणास दिसून येते. यामध्ये समाजातील शेतकरी, शेतमजुर, उपेक्षित, दुर्लक्षित राहिलेल्या घटकांचाही समावेश होतो. त्यात कृषि संस्कृतीचा विचार व त्यांच्या लोकजीवनाचे चित्रण यात आलेले आपणास दिसून येते.

शेतकरी, शेतमजुर, शेती अशा विषयांचे लेखन ज्या कादंबरीत झालेले आहे त्या कादंबरीच्या विवेचन किंवा चर्चा होणे गरजेचे आहे. जगाचा पोशिंदा जर उपेक्षित असेल, तोच जर उपाशीपोटी झोपत असेल तर कृषिप्रधान देशात शेतकऱ्यांची दयनीय अवस्था या साहित्यातुन प्रगट झाल्या पाहिजेत. जर झाल्या असतील तर अशा कादंबऱ्यांचा विचार होणे गरजेचे आहे असे संशोधक विद्यार्थ्याला वाटते म्हणून नव्वदोत्तरी ग्रामीण कादंबरी असा विषय निवडला कारण नव्वद नंतर देशात सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय, औद्योगिकदृष्ट्या अमुलाग्र बदल झाला त्याचा परिणाम कृषि जीवनावर कसा पडला या विषयी कादंबरीकाराने जी मांडणी केली आहे त्या संदर्भाने विवेचक अभ्यास करण्याचे µÖÖ•ÖÖß»Ö †ÖÆê.

१.२ संशोधन विषयाचे महत्त्व :

नव्वदोत्तरी मराठी ग्रामीण कादंबऱ्यातील कृषि संस्कृती व लोकजीवन : एक विवेचक अभ्यास (निवडक कादंबऱ्या) या विषयाचे महत्त्व सांगत असतांना आपला देश कृषिप्रधान देश असुन कादंबऱ्यातुन किंवा साहित्यातुन कृषि संस्कृतीला दिलेले महत्त्व व त्यांच्या लोकजीवनाचे एकुण चित्रण यांचा अभ्यास करण्याचा प्रयास करण्यात येत आहे. कृषि क्षेत्रातील बदलता अनुमान, आधुनिकता, तंत्रज्ञान यांचा वापर त्यामुळे कृषि संस्कृतीवर होत असलेला परिणाम याचा अभ्यास करण्याचा प्रयास आहे.

या कालखंडातील मराठी ग्रामीण कादंबऱ्याचा विचार करतांना बहुतांश कादंबरीने कृषि व त्या क्षेत्राशी निगडीत विविध प्रश्नाविषयी चिंतनशिल लेखन केल्याचे दिसते. कृषि संस्कृती, कृषि जीवन इत्यादींशी अनुबंधित असलेल्या शेतकरी, कष्टकऱ्यांचे वास्तव चित्रण १९६० नंतरच्या विविध ग्रामीण कादंबऱ्यातुन आले आहे. उदा.आनंद यादव यांची 'गोतावळा', रा.रं. बोराडे यांची 'पाचोळा' उध्दव शेळके यांची 'धग' ते 'बारोमास' तहान, पखाल इत्यादी कादंबऱ्यामध्ये कृषि जीवन व कृषि संस्कृतीचे वास्तव दर्शन घडते. या विषयाचे सखोल चिंतन करणाऱ्या कादंबऱ्याचा संशोधनासाठी निवड करण्याचे योजीले आहे म्हणून प्रस्तुत विषय मला महत्त्वाचा वाटतो.

१.३ संशोधनाची उद्दिष्ट्ये :

संशोधन कार्याची सुरुवात करत असतांना ते कार्य व्यवस्थितपणे पार पाडण्यासाठी काही संशोधनाची उद्दिष्ट्ये समोर ठेवावी लागतात. संशोधन निश्चित झाल्यानंत विषय निश्चितीची उद्दिष्ट्ये व संशोधनाची उद्दिष्ट्ये निश्चित झाल्याशिवाय दिशा ठरविता येत नाही.

1) मराठी ग्रामीण साहित्य उगम, विकास व प्रभाव अभ्यासणे.
2) मराठी कादंबरीचे स्वरूप व विकास अभ्यासणे.
3) मराठी ग्रामीण कादंबरीतील कृषि संस्कृतीचा अभ्यास करणे.
4) ग्रामीण कादंबऱ्यातील भाषा शैलीचा अभ्यास करणे.

5) ग्रामीण कादंबऱ्यातील लोकजीवनाचा अभ्यास करणे.

6) ग्रामीण कादंबऱ्यातील कृषि संस्कृतीशी निगडीत व्यतीरेखांचा अभ्यास करणे.

7) ग्रामीण कादंबऱ्यातील कृषि संस्कृती व लोकजीवन यांचा तुलनात्मक अभ्यास करणे.

8) बदलत्या काळाचा कृषि संस्कृतीवरील परिणामांचा शोध घेणे.

१.४ गृहितकृत्ये :

1) मराठी ग्रामीण कादंबऱ्यातील कृषि संस्कृती व कृषि जीवनाचे सखोल चिंतन या पूर्वीच्या अभ्यासक, संशोधनकांनी केले आहे, त्या आधारे संशोधन केले जाईल.

2) मराठी ग्रामीण कादंबरीतील कृषि जीवनातील दुःख, दारिद्र्य, वेदना, विविध प्रश्न, समस्या या संबंधाने या पूर्वीच्या संशोधकांनी हे विचार मांडले आहेत, त्या संदर्भाचाही विचार केला जाईल.

3) मराठी ग्रामीण कादंबरीतील निर्सगाचे कृषि चित्रण केले आहे.

4) ग्रामीण कादंबरीतील कुटूंब व्यवस्थेचे चित्रण केले आहे.

5) ग्रामीण कादंबरीत सामाजिक, आर्थिक व राजकीय जीवनाचे चित्रण आले आहे.

१.५ संशोधन पध्दती :

प्रस्तुत शोधप्रबंधासाठी म्हणजे 'नव्वदोत्तरी मराठी ग्रामीण कादंबऱ्यातील कृषि संस्कृती व लोकजीवन : एक विवेचक अभ्यास' (निवडक कादंबऱ्या) असा विषय निवडला आहे. या संशोधन विषयाची उद्दिष्ट्ये पूर्ण करण्यासाठी संशोधन विषयातील तथ्ये व वस्तुनिष्ट माहिती शोधण्यासाठी शास्त्रशुध्द माहितीचा आधार घेणार आहे व विविध संदर्भग्रंथाचा पुढे आधार घेणार आहे.

संशोधन साहित्याचे संकलन हे वस्तुनिष्टपणे करण्यासाठी त्यामध्ये व्यक्तीनिष्टता तसेच पूर्वग्रहदूषितपणा येणार नाही याची काळजी घेणार आहे. संशोधन विषयाचे अध्ययन करण्यासाठी संशोधकाला विविध स्वरूपाची माहिती मिळवावी लागेल. त्या दृष्टीने संशोधक

मराठी ग्रामीण साहित्यातील निवडक कादंबऱ्याचा अभ्यास करणार आहे. यातील क्रमप्राप्त तथ्यांच्या आधारावर संशोधन कार्य पार पाडले जाईल. संशोधन प्रबंधात विशेषत: वर्णनात्मक व निरिक्षणात्मक संशोधन पध्दतीचा वापर करण्यात येणार आहे.

१.६ संशोधनाची मर्यादा :

संशोधनक कार्यात काही निश्चित काळ व साहित्याची मर्यादा असणे आवश्यक आहे. विषयाची निवड करतांना विषय अध्ययन करणे सोयीस्कर जावे त्यावरील तथ्य संकलन व विश्लेषण करणे सहज शक्य व्हावे यासाठी निवडक कादंबऱ्याची निवड केली आहे. संशोधन क्षेत्र म्हणजे ज्या विषयाची निवड आपण केली आहे त्याचे अध्ययन क्षेत्र व अभ्यासाच्या दृष्टीने निश्चित करण्यात आलेल्या मर्यादा होय.

१.७ प्रकरण आराखडा :

संशोधनाच्या सोयीसाठी मार्गदर्शक म्हणून प्रकरणाचा आराखडा करण्यात आला तो पुढीलप्रमाणे.

प्रस्तावना :

या भागात प्रस्तावना, विषयाचे महत्त्व, संशोधनाची उद्दिष्ट्ये, गृहितके, संशोधन पध्दती, संशोधन मर्यादा व प्रकरण आराखडा यांचा समावेश करण्यात येणार आहे.

प्रकरण पहिले : मराठी ग्रामीण कादंबरी स्वरूप आणि संकल्पना

एकूणच ग्रामीण कादंबरीचे स्वरूप आणि संकल्पना स्पष्ट करण्याचा संशोधकाचा प्रयत्न आहे.

प्रकरण दुसरे : नव्वदोत्तरी ग्रामीण कादंबरीतील कृषिजीवन

कादंबऱ्यातील कृषि जीवनाचा उहापोह करण्याचा संशोधकाचा प्रयत्न आहे.

प्रकरण तिसरे : नव्वदोत्तरी निवडक कादंबरीतील कृषि संस्कृती व लोकजीवनाचा अनुबंध

एकूणच कादंबरीतील कृषि संस्कृती अभ्यासावयाची आहे, त्याच बरोबर लोकजीवनाचा अनुबंध यांचा संशोधक अभ्यास करणार आहे.

प्रकरण चौथे : कादंबरीतील कृषि संस्कृतीचे दर्शन

या प्रकरणात कृषि संस्कृतीचा अभ्यास केला जाणार आहे. कादंबऱ्यातील कृषिशी निगडीत सर्व संस्कृतीचा अभ्यास केला जाईल.

प्रकरण पाचवे : बदलत्या काळाचा कृषि संस्कृतीवरील परिणामाविषयी चिंतन

आधुनिकता, यंत्राचा अतिवापर यामुळे झालेल्या कृषि संस्कृतीवरील परिणाम यांचा उहापोह केला जाणार आहे.

प्रकरण सहावे : भाषाशैली

या प्रकरणात कादंबऱ्यातील भाषा शैलीचा अभ्यास केला जाणार आहे.

प्रकरण सातवे : उपसंहार / निष्कर्ष

नव्वदोत्तरी कादंबऱ्यातील कृषि संस्कृतीतील दुःख, दारिद्र्य, प्रामाणिकपणा, सहज स्वाभाविकपणा, विधी संबंधता, एकमेकांबद्दलची आपुलकी आणि लोकव्यवहारातील भाषाशैली हे वैशिष्ट्ये म्हणावे लागेल. मनातील भावना, वास्तविकता व उदात्त जीवनाचे दर्शन घडते.

ÃÖ¤¾³ÖÃÖ“Öß

1) मराठी ग्रामीण साहित्य परिसर व प्रवाह - कुलकर्णी गो.म. मेहता प्रकाशन, पुणे १९९९.

2) धार आणि काठ - नरहर कुरुंदकर, देशमुख आणि कंपनी, पुणे १९७१.

3) ग्रामीण साहित्य : स्वरूप आणि शोध, संपा.नागनाथ कोत्तापल्ले, मेहता प्रकाशन, पुणे १९८९.

4) खडक आणि पाणी - गाडगीळ स.रा. पॉप्युलर प्रकाशन, मुंबई १९७१.

5) ग्रामीण साहित्य : प्रेरणा आणि प्रयोजन, गुंदेकर श्रीराम, दिलीपराज प्रकाशन, पुणे १९९९.

6) भारतीय संस्कृतीकोष खंड - ०४, जोशी महादेवशास्त्री, अनमोल प्रकाशन, पुणे.

7) भारतीय संस्कृतीकोष खंड - ०५, जोशी महादेवशास्त्री, संस्कृतीकोष प्रकाशन, पुणे १९९१.

8) मराठी साहित्य : प्रेरणा व स्वरूप, संपा.पवार गों.मा. पॉप्युलर प्रकाशन, ´Öã²Ö‡ 1986.

9) मराठी कादंबरीचा इतिहास, बांदिवडेकर, मेहता प्रकाशन, पुणे १९८९.

10) ग्रामीण साहित्य - बोराडे रा.र. साकेत प्रकाशन, औरंगाबाद, १९९२

11) मराठी साहित्य : समाज आणि संस्कृती, आनंद यादव, मेहता प्रकाशन, पुणे १९८५.

×™¯Ö : सदरील संशोधन आराखड्यात संशोधनाला गती येईल त्याप्रमाणे आवश्यक ठिकाणी बदल होणे संभवनीय आहे.

संशोधक मार्गदर्शक

डॉ.वैजनाथ अनमुलवाड
भाषा वाङ्मय व संस्कृती अभ्यास संकुल,
स्वा.रा.ती.म. विद्यापीठ, नांदेड.

संशोधक विद्यार्थी

विनायक मारोतराव गव्हाणे
आनंदभवन, एकतानगर, गोकुंदा
ता.किनवट जि.नांदेड.

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.

मानव्य विद्याशाखे अंतर्गत मराठी विषयातील पीएच.डी. (विद्यावाचस्पती)
पदवीसाठी सादर करावयाचा शोध - प्रबंधाचा स्थुल आराखडा.

संशोधन विषय

"नवोदत्तरी मराठी ग्रामीण कादंबऱ्यांतील कृषि संस्कृती व लोकजीवन : एक विवेचक अभ्यास." (निवडक कादंबऱ्या).

संशोधक

विनायक मारोतराव गव्हाणे
आनंदभवन, एकतानगर, गोकुंदा ता.किनवट जि.नांदेड.

मार्गदर्शक
डॉ.वैजनाथ अनमुलवाड
भाषा वाङ्मय व संस्कृती अभ्यास संकुल,
स्वा.रा.ती.म. विद्यापीठ, नांदेड.

संशोधन केंद्र

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ,
भाषा, वाङ्मय व संस्कृती अभ्यास संकुल, नांदेड.

´ÖÖ“Ö - 2016